# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेस नोट क्र-२०० दिनांक -२७/०५/२०२४

## आर्थिक फसवणुक करणारा सराईत आरोपी तोतीया पोलीस निरीक्षक यास वालीव पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण शाखेकडुन अटक

यातील फिर्यादी श्री. महेंद्रकुमार हेमाराम पुरोहीत यांचे मोबाईलचे विक्रीचे दुकान असुन एका अनोळखी पुरुष इसमाने त्यांचे दुकानात येवुन त्यांना मोबाईल खरेदी करावयाचा असल्याचे सांगुन फिर्यादीचे दुकानातील १ लाख ६० हजार रुपये किंमतीचा गॅलेक्सी झेड फोल्ड-५ मोबाईल पसंद करुन खरेदी केला. सदर अनोळखी पुरुष इसमाने नमुद मोबाईलचे खरेदी मुल्य १ लाख ६० हजार रुपये फिर्यादीचे बँक अकाऊंटवर एन.ई.एफ.टी. मार्फतीने १ लाख १० हजार रुपये चुकते केल्याचा मोबाईल एडीटेड खोटा मॅसेज फिर्यादीस दाखवीला. तसेच ऊर्वरीत राहीलेल्या रक्कमेचा ५०,०००/- रुपयाचा पुढील तारखेचा धनादेश फिर्यादीस देवुन गॅलेक्सी झेड फोल्ड-५ मोबाईल खरेदी केला. तथापि कालांतराने फिर्यादीने वरील रक्कम रुपये १ लाख १० हजार रुपये त्यांचे बँक खात्यावर रक्कम आली अगर कसे ? बाबत खात्री केली असता फिर्यादीस त्यांचे बँक खात्यावर वरील पैकी कोणतीही रक्कम आली नसल्याचे दिसुन आले. तसेच अनोळखी इसमाने फिर्यादीस दिलेला ५००००/- रुपयेचा धनादेश देखील न वटता तो बाऊंन्स झाला सबब, फिर्यादी श्री.महेंद्रकुमार पुरोहीत यांचे तक्रारीवरुन वालीव पो.ठाणे गु.र.क्र.२७७/२०२४ कलम ४२०,४०६ भा.दं.वि.अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला.

सदर गुन्हयाचे अन्वेषणा दरम्यान गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या माहीतीवरुन वालीव पोलीस ठाण्याचे अभिलेखावरील समगुन्हे प्रणालीचे फसवणुक करुन आर्थिक गुन्हे करणारा अभिलेखावरील आरोपीत नामे मोहम्मद फैजुल अबुल हसन शेख वय- २८ वर्ष, रा. सायरा कॉम्पलेक्स,फणसपाडा, वालीव वसई पुर्व यास यशस्वीरित्या बोयदापाडा नाका येथुन ताब्यात घेण्यात आले. नमुद आरोपीताचे अंगझडतीत मिळुन आलेल्या बॅगमध्ये पोलीस निरीक्षक दर्जाचा पोलीस अधिकारी वापरत असलेले ३ खाकी गणवेश , १ पिकॅप, ३ गोल बॅरीकॅप, मुंबई पोलीस नाव असलेली गोल टोपी, एक हाथकडी (बेडी ), लाल रंगाचा बेल्ट स्टीलचे बक्कलसह, उच्चप्रतीची एअरगण, पोलीस निरीक्षकाचे स्वतःचे नावे पोलीस विभागाचे ओळखपत्र, तसेच स्कॅन करुन तयार केलेले पोलीस शिपाई पदाचे नियुक्ती पत्र, अशा एकुण ३० पेक्षा अधिक पोलीस विभागाशी निगडीत असलेल्या चिज वस्तु मिळुन आलेल्या आहेत नमुद वस्तु पंचनामा करुन ताब्यात घेण्यात आलेल्या आहेत. आरोपीने सदर पोलीस अर्टीकलचा आणखी कुठे वापर केला आहे ? का याबाबत तपास सुरु आहे.

आरोपीताकडुन गुन्हयातील अपहरीत केलेला १ लाख ६० हजार रुपये किंमतीचा मोबाईल हस्तगत करण्यात आलेला आहे.

आरोपीत फैजुल हसन शेख याचेवर दाखल असलेल्या गुन्हयाचा भुमीअभिलेख खालीलप्रमाणे

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं व कलम |
|---|---|---|
| १ | **वालीव पोलीस ठाणे** | **गु.र. नं ८४९/२०२३ भा.द.वि.स कलम ४२० प्रमाणे** |
| २ | **वालीव पोलीस ठाणे** | **गु.र. नं २७७/२०२४ भा.द.वि.स कलम ४२०, ४०६ प्रमाणे** |

वरील कामगीरी श्रीमती पौर्णीमा चौघुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ- २ वसई, श्री. उमेश माने- पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग, वालीव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जयराज रणवरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. जिलानी सय्यद यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण शाखेचे स.पो.नि. सचिन सानप, पो.हवा/ मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, सतीश गांगुर्डे, बाळु कुटे, पो.अं/ विनायक राऊत, अभिजीत गढरी यांनी यशस्वीरित्या कामगीरी पार पाडली आहे.